**रे.दि.मु.नं.११८/२०१३**
**नि.१०७ लगत**

**प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करतो की,**

| | |
|---|---|
| **माझे नाव** | **:- हरुण गुलाम मुजावर** |
| **वय** | **:- ४४ वर्षे** |
| **व्यवसाय** | **:- शेती व नोकरी** |
| **पत्ता** | **:- १९९३ रविवार पेठ, ता.वाई जि.सातारा.** |

**<u>सरतपास प्रतिवादीतर्फे ॲड. श्री.पी.ई.साळुंखे यांचेमार्फत -</u>**

१३. गुलाब अब्दुल मुजावर माझे वडील आहेत. आता मला निशाणी २७ वरील कागद दाखवण्यात आला. सदरचा कागद म्हणजे अब्दुल रहिमान मुजावर यांचा जुना खाते उतारा आहे. अब्दुल रहिमान मुजावर माझे आजोबा आहेत. या खाते उता-यात वाद मिळकतीचा सर्व्हे नंबर नमुद केला आहे तो ३७४/६ असा आहे. सदरच्या खाते उता-यावर गावकामगार तलाठी वाई यांची सही आहे.

१४. आता मला निशाणी २८ वरील फेरफार क्र.२०४३ दाखवण्यात आला. सदरचा फेरफार माझ्या आजोबांनी राज महम्मद सुलतान तर्फे सय्यद खुदबुद्दीन काझी याला मिळकती गहाण दिल्या होत्या त्या बाबतचा आहे.

१५. आता मला निशाणी ७७/१ वरील कागद दाखवण्यात आला. सदरचा कागद गहाण खताचा असुन त्याची प्रमाणीत प्रत आहे. सदरचे गहाणखत सन १९३२ साली झाले होते. सदरचे गहाणखत मी सातारा दुय्यम निबंधक कार्यालयातुन प्राप्त केले. मुळ गहाणपत्र आमच्याकडे आहे. मी स्वतःहुन सांगतो मुळ गहाणपत्र राज महम्मद कडे आहे. माझ्या आजोबांनी करुन दिलेल्या गहाणखतातील मजकुर बरोबर आहे. सदरचे गहाणखताची प्रमाणीत प्रत ९० वर्षांपेक्षा जास्त जुनी असल्याने त्यास वस्तुक्रमांक अ देण्यात येते.

१६. आता मला निशाणी ७७/३ वरील कागद दाखवण्यात आला. सदरचा कागद म्हणजे इनाम रजिष्टरच्या उता-याची प्रमाणीत प्रत आहे. त्यात वाद मिळकतीचा समावेश आहे. इनाम पत्रकाची प्रत वाई येथील तहसिल कार्यालयातुन काढली आहे. त्यास **निशाणी १०८** देण्यात येते.

१७. आता मला निशाणी ७७/४ वरील एकुण २५ पावत्या दाखवण्यात आल्या. सदरच्या पावत्या कर भरल्याच्या आहेत. सदरचा कर माझ्या आजोबांनी भरला आहे. त्या पावतीमध्ये देवस्थान जमीनीचा समावेश आहे. सदरच्या पावत्या माझ्या आजोबांना तलाठी कार्यालयातुन देण्यात आल्या आहेत.

१८. आता मला निशाणाी ८७/१ वरील कागद दाखवण्यात आला. सदरचा कागद माझे आजोबा व राज महम्मद सुलतान यांच्यात झालेल्या दाव्याच्या रजिष्टरची प्रमाणीत प्रत आहे. सदरची प्रमाणीत प्रत मी वाई न्यायालयातुन काढुन घेतली आहे.

१९. आता मला निशाणी ८७/२ वरील कागद दाखवण्यात आला. सदरचा कागद राज महम्मद सुलतान यांच्या घराचा सिटी सर्व्हे उता-याची प्रमाणीत प्रत आहे. सदरचा कागद त्यांचा मृत्यु कधी झाला याबाबत दाखल केला आहे. खैरुद्दीन खुदबुद्दीन काझी हे दिनांक २६.०९.१९४० साली मयत झाले.

२०. आता मला निशाणी १०८/१ वरील कागद दाखवण्यात आला. सदरचा कागद म्हणजे सर्व्हे नंबर ३७४/६/७/८ चे कडई पत्रकाची प्रमाणीत प्रत आहे. सदरचा सातबारा सन १९२६-१९२७ ते १९३१-३२ चा आहे. कडई पत्रकाच्या उता-याची प्रमाणीत प्रत मी तहसिल कार्यालय वाई यांच्याकडुन घेतली आहे.त्यास **निशाणी १०९** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री.आर.आर. यादव यांचे मार्फत पुढील तारखेपर्यंत तहकुब**

**समक्ष/ श्रवणोत्तर स्वीकृत**

**(एस.एस.पळसुले)**

**दिनांक :- १९.११.२०२४** **तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर,वाई**